देवदासी व त्यांच्या मुलांच्या पुनर्वसनाकरीता
सुधारित योजना राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०११/प्र.क्र.२४२(भाग-१)/का.०२
नवीन प्रशासन भवन, ३रा मजला,
मादम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ मार्च, २०१२

**वाचा:** १) शासन निर्णय समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र.एसडब्ल्यूआय-१०८५/२९०७३/१४८/सीए-३, दिनांक ८.४.१९८६ व शासन निर्णय क्र.८९/२००१ डिआरएस-२०००/प्र.क्र.४१६/का-२, दिनांक १५.६.२०११
२) शासन निर्णय समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र.एसडब्ल्यूआय/१०८५/१३६२७/सीए-३, दिनांक १३.१२.१९८५ अन्वये योजना सुरु झाली असून शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण-१०९९/प्र.क्र.४१४/का-३, दिनांक १८.८.२००१
३) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.डिआरएस-१०९६/प्र.क्र.३९६/का-२, दिनांक २९.८.१९९४ व शासन निर्णय क्र.८९/२००१, डिआरएस-२०००/प्र.क्र.४१६/का-२, दिनांक १५.६.२००१
४) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.डिआरएस-१०९३/प्र.क्र.३९६/का-२, दिनांक २९.८.१९९४ व शासन निर्णय क्र.८९/२००१, डिआरएस-२०००/प्र.क्र.४१६/का-२, दिनांक १५.६.२००१

**शासन निर्णय** :- देवदासी व त्यांच्या मुलांच्या पुनर्वसनाकरीता योजना व समाज प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना अनुदाने, इ. योजनांमध्ये सुधारणा करुन खालील प्रमाणे सुधारित योजना राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

**१) देवदासी अथवा देवदासींच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान योजना:-** शासन निर्णय समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र.एसडब्ल्यूआय-१०८५/२९०७३/१४८/सीए-३, दिनांक ८.४.१९८६ व शासन निर्णय क्र.८९/२००१ डिआरएस-२०००/प्र.क्र.४१६/का-२, दिनांक १५.६.२०११ नुसार देवदासी अथवा देवदासींच्या मुलींच्या विवाहासाठी देण्यात येणारे रु.१०,०००/- इतक्या रकमेच्या अनुदान योजनेत सदर शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात येत असून, सुधारित योजना खालीलप्रमाणे राबविण्यास या निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**लाभाचे स्वरुप -** देवदासी प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्रातील १० वर्षाचे वास्तव्य असलेल्या १९९६ पुर्वीच्या देवदासींना/देवदासींच्या मुलींना विवाहासाठी विवाह सोहळयाच्या खर्चाकरीता मुलगी पदवीधर नसल्यास रु.२५,०००/- (पंचवीस हजार) तसेच वधु जर पदवीधर असेल तर मात्र रु.५०,०००/- (पन्नास हजार) इतकी रक्कम वधुच्या खात्यात राष्ट्रीयकृत बॅकेत जमा करण्यात येईल.

**लाभासाठी अर्हता** :- सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्हता खालील प्रमाणे राहील:-
१) अर्जदार देवदासी ही १९९६ पूर्वीची मान्यता प्राप्त देवदासी असावी.
२) १० वर्षाचे महाराष्ट्रातील वास्तव्य असावे.
३)देवदासी किंवा तिच्या कुटुंबियांचे उत्पन्न शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबाच्या मर्यादेत असावे.
४)विवाहेच्छुक देवदासी किंवा तिची मुलगी यांचे वय १८ वर्षे व नियोजित वराचे वय २१ पूर्ण असावे.
५)योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे आवश्यक कागदपत्राच्या पुर्ततेसह विवाहापूर्वी किंवा विवाहानंतर ९० दिवसांचे आत करावा.

**अत्यावश्यक कागदपत्र:-** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहीलः-

१. अर्जदाराचा विहित नमुन्यातील अर्ज
२. अर्जदाराचा देवदासी असल्याबाबतचा दाखला
३. वधूचा वयाचा दाखला
४. वराचा वयाचा दाखला
५. महाराष्ट्रातील वास्तव्य दाखला
६. तहसीलदारांनी दिलेल्या उत्पन्न दाखला
७. विवाह नोंदणीचा दाखला
८. विवाहापूर्वी आलेल्या अर्जाबाबत वधु व वर यांचेकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र एक महिन्याच्या आत जिल्हा महिला कार्यालयास सादर करण्यात येईल असे हमीपत्र.
९. पदवीधर देवदासी / देवदासीची मुलगी असल्यास पदवी प्रमाणपत्र किंवा मार्कशीट
१०. प्रथम विवाह असल्याबाबतचे हमीपत्र

**कार्यपध्दती:-** सदर अर्ज मंजूर करण्यासंदर्भात कार्यपध्दती खालील प्रमाणे राहील :-
१) संबंधित अर्जदार महिलेने आवश्यक त्या कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा.
२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी गृह चौकशी करावी व अर्जदाराचा अर्ज व कागदपत्रांची छाननी करुन अनुदान मंजूर करावे.
३) विवाहापूर्वी आलेल्या अर्जावर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करुन विवाह प्रसंगी रु.२५०००/- अनुदानाचे वितरण करावे (पदवीधर वधुच्या बाबतीत रु.५०,०००/-) चा धनादेश / धनाकर्ष वधूस सुपूर्द करावा.
४) विवाहानंतर अर्ज प्राप्त झाल्यास प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून दिड महिन्याच्या आत अनुदान मंजूरी व अनुदान वितरणाची कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून करण्यात यावी.

**लेखाशिर्ष** :- सदर योजनेसाठी येणार खर्च, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज कल्याण, १०३ महिला कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०९)(०२) देवदासी पुनर्वसन योजना (२२३५-१३९-९), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**(२) संस्थेतील अनाथ मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य योजना :-** शासन निर्णय समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र.एसडब्ल्यूआय/१०८५/१३६२७/सीए-३, दिनांक १३.१२.१९८५ अन्वये योजना सुरु झाली असून शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण-१०९९/प्र.क्र.४१४/का-३, दिनांक १८.८.२००१ अन्वये सुधारणा केलेल्या योजनेनुसार संस्थेअंतर्गत निराश्रीत मुलीच्या विवाहासाठी रु.१५,०००/- याप्रमाणे सहाय्यक अनुदानाची योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात येत असून, सुधारित योजना खालील प्रमाणे राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

**योजनेचे स्वरुप :-** अनाथालये, शासकीय राज्यगृहे, आधारगृहे व सुधारित माहेर योजनेंतर्गत कार्यरत संरक्षणगृहे, अल्पमुदती निवासगृहे, व शासन अनुदानित बालगृहे कार्यरत असलेल्या शासकीय तसेच स्वयंसेवी संस्था मधील निराश्रीत मुलींच्या विवाहाकरीता रु.२५०००/- याप्रमाणे सहायक अनुदान पुनर्वसनासाठीशासनामार्फत देण्यात येईल.

संस्थेतील मुलींचा विवाह जमल्यानंतर विहित नमुन्यातील विवाह मान्यता व अनुदान प्रस्ताव संबंधित संस्था अधिक्षकांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत आयुक्तालयास सादर करावा. आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या मान्यतेने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शासनाच्या वतीने मुलीच्या विवाहासाठी व संसारोपयोगी वस्तू मुलीच्या गरजेनुसार संसारोपयोगी भांडी मुलीच्या गरजेनुसार खरेदी करण्यासाठी एकूण रु.२५,०००/- इतक्या रकमेचा धनादेश मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्याबाबत कार्यवाही करेल.

**लाभासाठी अर्हता :-** १. मुलगी अनाथालये, शासकीय राज्यगृहे, आधारगृहे सुधारित माहेर योजनेअंतर्गत कार्यरत संरक्षणगृहे, अल्पमुदती निवासगृहे, शासन अनुदानित बालगृहे या संस्थेतील प्रवेशित असावी. २.मुलीचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. ३. मुलीचे दोन्ही पालक हयात असतील अथवा तिचे आई अथवा वडील या दोघांपैकी एक हयात असतील तर कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- पेक्षा जास्त नसावे. ४.विवाहासाठी इतर कोठूनही आर्थिक सहाय्ये मिळाले नसावे.

**अत्यावश्यक कागदपत्र :-** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील:-

१. संबंधित लाभार्थी मुलीने स्वतः अर्ज करुन तो संबंधित संस्थेच्या अधिक्षकांमार्फत आयुक्तालयास सादर करावा.

२. वय १८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. मुलीचे दोन्ही पालक हयात असतील अथवा तिचे आई अथवा वडील या दोघांपैकी एक हयात असतील तर कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- पेक्षा जास्त नसावे.

४. विवाहासाठी इतर कोठूनही आर्थिक सहाय्ये मिळाले नसावे.

**अत्यावश्यक कागदपत्र :-** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील:-

१. संबंधित लाभार्थी मुलीने स्वतः अर्ज करुन तो संबंधित संस्थेच्या अधिक्षकांमार्फत आयुक्तालयास सादर करावा.

२. मुलीचे पालक हयात असल्यास पालकांचे उत्पन्न दर्शक प्रमाणपत्र

३. विवाहाचे वेळी मुलींचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असलेबाबत वय दर्शक प्रमाणपत्र

४. मुलीला अन्य कोठूनही आर्थिक सहाय्य मिळाले नसल्याबाबतचे हमीपत्र संस्था प्रमुखाचे अभिप्राय

**लेखाशिर्ष** :- सदर योजनेवरील खर्च हा २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाज कल्याण, १०३-महिला कल्याण, सामाजिक आधार, (०१)(०१) स्वागत केंद्र, राज्यगृहे व संरक्षणगृहे (२२३५-१२५-४) योजनेतर, ३१-सहाय्यक अनुदाने, मागणी क्र.एक्स-१, या शिर्षाखाली करण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**३)देवदासींच्या कल्याणाचे काम करणाऱ्या दिवंगत लताताई सकट योजना :-** शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.डिआरएस-१०९६/प्र.क्र.३९६/का-२, दिनांक २९.८.१९९४ व शासन निर्णय क्र.८९/२००१, डिआरएस-२०००/प्र.क्र.४१६/का-२, दिनांक १५.६.२००१ नुसार **समाज प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना अनुदान** या योजनेअंतर्गत देवदासींची अनिष्ट प्रथा नाहिशी करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य करीत असलेल्या स्वयंसेवी संस्थांना त्यांच्या कार्याला प्रोत्साहन म्हणून शासनातर्फे देण्यात येणाऱ्या रु.१०,०००/- इतक्या प्रोत्साहनपर अनुदानाच्या योजनेमध्ये या निर्णयान्वये सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार **देवदासींच्या कल्याणाचे काम करणाऱ्या दिवंगत लताताई सकट यांच्या नावाने राज्य स्तरावर व्यक्तीला एक लाख रुपयांचा पुरस्कार तसेच दोन संस्थांना रुपये ५०,०००/- चा पुरस्कार** (एकूण ३ लाभार्थी पैकी १ व्यक्तिगत व २ संस्था) **देण्याबाबतची सुधारित योजना खालील प्रमाणे राबविण्यास या निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहेः-**

**१) वैयक्तिक लाभाचे स्वरुपः** देवदासी प्रथा निर्मुलन व देवदासींचे पुनर्वसन या क्षेत्रात नवीन देवदासी होण्यापासून प्रतिबंधाबाबत केलेले काम, धार्मिक कृती, समारंभ रोखण्यासाठी, किंवा समारंभ पार पाडण्यात भाग घेणाऱ्याविरुध्द किंवा त्यास अप प्रेरणा देणाऱ्याविरुध्द कार्यवाही करण्यासाठी पोलीसांची मदत घेवून दाखल केलेले गुन्हे, अशा देवदासी समर्पनातून सुटका केलेल्या महिला / मुलींना आश्रयगृह इ. मध्ये ठेवून त्यांचे केलेले पुनर्वसन, देवदासी स्त्री म्हणून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व / ओळख संपवून मुख्य प्रवाहात आणून सर्व साधारण स्त्रीयांप्रमाणे जगण्यासाठी केलेले व्यावसायिक प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी कार्य, देवदासी प्रथा निर्मुलन व देवदासींचे पुनर्वसन या क्षेत्रात **किमान ५ वर्ष** वा त्यापेक्षा अधिक वर्ष भरीव कार्य केलेल्या एका व्यक्तीस रु.१,००,०००/- व सन्मान चिन्ह या स्वरुपामध्ये हा पुरस्कार वर्षातून एकदा प्रदान करण्यात येईल.

२) **<u>स्वयंसेवी संस्था लाभाचे स्वरुपः</u>** देवदासी प्रथा निर्मुलन व देवदासींचे पुनर्वसन या क्षेत्रात नवीन देवदासी होण्यापासून प्रतिबंधाबाबत केलेले काम, धार्मिक कृती, समारंभ रोखण्यासाठी, किंवा समारंभ पार पाडण्यात भाग घेणाऱ्याविरुध्द किंवा त्यास अप प्रेरणा देणाऱ्याविरुध्द कार्यवाही करण्यासाठी पोलीसांची मदत घेवून दाखल केलेले गुन्हे , अशा देवदासी समर्पनातून सुटका केलेल्या महिला / मुलींना आश्रयगृह इ. मध्ये ठेवून त्यांचे केलेले पुनर्वसन, देवदासी स्त्री म्हणून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व / ओळख संपवून मुख्य प्रवाहात आणून सर्व साधारण स्त्रीयांप्रमाणे जगण्यासाठी केलेले व्यावसायिक प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी कार्य, देवदासी प्रथा निर्मुलन व देवदासींचे पुनर्वसन या क्षेत्रात **किमान ३ वर्ष वा त्यापेक्षा अधिक** वर्ष भरीव कार्य केलेल्या दोन स्वयंसेवी संस्थांना रु.५०,०००/- व सन्मान चिन्ह या स्वरुपामध्ये हा पुरस्कार वर्षातून एकदा प्रदान करण्यात येईल.

**<u>लाभासाठी अहर्ता :-</u>** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्हता खालील प्रमाणे राहील:-

१)संबंधित संस्थेने देवदासी प्रथा निर्मुलनासाठी किमान ५ वर्ष सातत्याने भरीव कार्य केलेले असावे.

२)सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा भारतीय संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली संस्थेची नोंदणी झालेली असावी.

३)सदर संस्था अर्ज करण्याच्या तारखेपूर्वी ३ वर्षे अगोदर नोंदणी झालेली असावी.

४)खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र असावे.

५)संस्था कोणत्याही जात, धर्म किंवा विशिष्ट गटासाठी कार्यरत नसावी.

६)संस्थेवर अथवा संस्थेतील कोणत्याही सदस्यावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा अथवा गुन्ह्यामध्ये शिक्षा / दंड झालेला नसावा.

**<u>आवश्यक कागदपत्र:-</u>** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील:-

१) विहित नमुन्यातील अर्ज

२) सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा भारतीय संस्था नोंदणी अधिनियम १८६०

३) संस्थेची घटना नियमावली

४) बँक बॅलन्स प्रमाणपत्र

५) संस्थेने मागील ५ वर्षात केलेल्या कार्याचा वार्षिक अहवाल (वर्षनिहाय)

६) चालू वर्षाचा अर्थसंकल्प

७) मागील तीन वर्षाचे ऑडिटेड स्टेटमेंट

**<u>कार्यपध्दती</u>** :- सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने अर्ज करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे करणे आवश्यक राहील:-

१) संबंधित अर्जदार संस्था/ व्यक्ती यांनी आवश्यक त्या कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्ज प्रत्येक वित्तीय वर्षाच्या १५ ऑक्टोबर पर्यंत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा.

२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दिड महिन्याच्या आत तपासणी/चौकशी करुन प्रस्ताव तपासणी अहवाल व स्वयंस्पष्ट शिफारशीसह आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा.

३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रत्येक वित्तीय वर्षाच्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत येणारे अर्ज स्वीकारावेत.

४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्राप्त झालेल्या एकूण अर्जाची छाननी करुन एका वैयक्तिक पुरस्कारासाठी गुणानुक्रमे ५ व्यक्तींची नामांकने व २ स्वयंसेवी संस्थांच्या पुरस्कारासाठी गुणानुक्रमे १० संस्थांची नामांकने शासनास प्रत्येक वित्तीय वर्षाच्या जानेवारी महिन्यापर्यंत सादर करावीत.

५) मा.मंत्री, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई व या क्षेत्रात कार्य करणारे दोन प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते यांच्या निवड समितीने सदर नामांकनापैकी एका वैयक्तिक पुरस्कारासाठी व २ स्वयंसेवी संस्थांच्या पुरस्कारासाठी अंतिम निवड करावी.

६) निवड झालेल्या व्यक्तीस/संस्थेस द्यावयाचे अनुदान आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे मंजूर करतील व मा.मंत्री, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत अनुदानाची रक्कम धनादेश /धनाकर्षाव्दारे अदा करण्यात येईल.

**लेखाशिर्ष** :- सदर योजनेसाठी येणारा खर्च २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज कल्याण, १०३ महिला कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०९)(०२) देवदासी पुनर्वसन योजना २२३५-१३९-९), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**४) देवदासींच्या मुलामुलींना शिक्षणासाठी मदत योजना :-** शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.डिआरएस-१०९३/प्र.क्र.३९६/का-२, दिनांक २९.८.१९९४ व शासन निर्णय क्र.८९/२००१, डिआरएस-२०००/प्र.क्र.४१६/का-२, दिनांक १५.६.२००१ नुसार देवदासी मुलामुलींना शालेय साहित्य व गणवेश योजनेत व विद्यार्थी मुलांस रु.३७०/- व मुलीस रु.४००/- इतक्या अनुदानाच्या रक्कमेत सुधारणा करण्यात येत असून, देवदासी प्रथेच्या समुळ उच्चाटनासाठी अधिकृत देवदासींच्या १ली व ते १०वी पर्यंतच्या मुला मुलींना शिक्षणासाठी मदत म्हणून शासनामार्फत सदर अनुदान विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना दरवर्षी पुस्तके, वह्या, इतर शालेय साहित्य, गणवेश यासाठी सरसकट मुलास रु.१६००/- व मुलीस रु.१७५०/- एवढी रक्कम देय राहील, अशी सुधारित योजना राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

**लाभासाठी अर्हता:-** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्हता खालील प्रमाणे राहील:-

१) २ अपत्यांपर्यंत लाभ मर्यादित राहील.

२) सदर अनुदान हे जिल्हा परिषद शाळा, महानगर पालिका शाळा तसेच मान्यता प्राप्त खाजगी शिक्षण संस्थेमधून शिकणाऱ्या १ली ते १०वी पर्यंतच्या देवदासीच्या मुला मुलींसाठी अनुज्ञेय राहिल.

३) योजनेचा लाभ हा १९९६ पूर्वीच्या ३००० नोंदविलेल्या देवदासींच्या मुला मुलींनाच अनुज्ञेय राहिल.

४) देवदासींचे महाराष्ट्रातील वास्तव्य १० वर्षे असावे.

५) देवदासी किंवा तिच्या कुटुंबियांचे उत्पन्न शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या आर्थिक दृष्ट्या मागास कुटुंबाच्या मर्यादेत असावे.

**अत्यावश्यक कागदपत्र:-** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील:-

१) विहित नमुन्यातील अर्ज

२) लाभार्थ्यांच्या शालेय वर्गाबाबत तसेच येणाऱ्या संभाव्य खर्चाबाबत शाळेच्या मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र

३) सन १९९६ पुर्वीची देवदासी असल्याबाबतचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र

४) तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला

५) १० वर्ष महाराष्ट्रातील वास्तव्याचा दाखला

६) पाल्य चालू वर्षात घेत असलेले शिक्षण पुर्ण करणार असलेबाबत व मिळालेले अनुदान आपल्या मुलांच्या शिक्षणाकरीता वापरणार असल्याचे पालकांचे हमीपत्र.

**कार्यपध्दती:-** सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र होण्यासाठी अर्जदाराने अर्ज करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे करणे आवश्यक राहील:-

१) देवदासींच्या १ली ते १०वी पर्यंतच्या मुला मुलींना शिक्षणासाठी मदत व्हावी म्हणून या योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान अपुरे आहे. सदर अनुदान दर वर्षी देताना प्रत्येक विद्यार्थ्यास येणारा खर्च शाळेच्या मुख्यध्यापकांमार्फत विद्यार्थ्यांच्या नावानीशी तो ज्या इयत्तेमध्ये शिकत आहे त्या इयत्तेसाठी व त्या वर्षी शालेय साहित्य, गणवेश इ. साठी लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेसह प्रमाणित करुन घेवून त्याप्रमाणे सहाय्यक अनुदान वितरणाचा प्रस्ताव शाळा सुरु झाल्यापासून दिड महिन्याच्या आत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा.

२) वार्षिक उत्पन्नाची अट सामाजिक न्याय विभागाने सुधारित केलेल्या आर्थिक दृष्ट्या मागास कुटुंबाच्या उत्पन्न मर्यादेप्रमाणे राहील.

३) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून दिड महिन्याच्या आत त्यांनी सर्व कागदपत्रांची तपासणी करुन अर्जदार देवदासी महिलेच्या बँक खात्यावर मुख्यध्यापकांनी प्रमाणित केल्याप्रमाणे रक्कम जमा करावी.

४) सदर रक्कम ज्या कारणासाठी अदा केलेली आहे त्याच कारणासाठी तिचा वापर केला आहे याबाबतचे हमीपत्र वजा उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित अर्जदार देवदासी महिलेकडून शाळेच्या मुख्यध्यापकांनी दिड महिन्याच्या आत घ्यावयाचे आहे.

५) सर्व अर्जदार देवदासी महिलांचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सारांश उपयोगिता प्रमाणपत्र /अहवाल व संबंधित अर्जदार महिलांनी लिहून दिलेले हमीपत्र वजा उपयोगिता प्रमाणपत्र मुख्यध्यापकांनी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना दिड महिन्याच्या आत सादर करावयाचे आहे.

**लेखाशिर्ष** :- सदर योजनेसाठी येणारा खर्च, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज कल्याण, १०३ महिला कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०९)(०२) देवदासी पुनर्वसन योजना २२३५-१३९-९), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदर सुधारित योजना सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून अंमलात येईल.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.६५/१२/व्यय-६, दिनांक ४.२.२०१२ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in वर उपलब्ध असून सांकेतांक क्र.२०१२०३०१११११४३५३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शं.शा.पढाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव , वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभागाचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिवांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
(योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकाही अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व परीक्षा) महाराष्ट्र -१/२, मुंबई /नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व जिल्हा विवाह नोंदणी निबंधक. (जि.म. व बा.वि.अ.मार्फत)
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
निवडनस्ती/ का.२